पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मातंवि/१२/कावि/१०४/२०१६
दिनांक: ०६/०४/२०१६

विषय : "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत "Theme Based Cleanliness" बाबत....
संदर्भ : श्री. प्रवीण प्रकाश, भा.प्र.से ,संयुक्त सचिव व मिशन निदेशक (एस.बी.एम), शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक डीओ क्र.SB/SBM/34/2016 दिनांक १/४/२०१६

परिपत्रक,

स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत प्राप्त संदर्भीय ई-मेल अन्वये "स्वच्छ भारत अभियान" चे "Theme Based Cleanliness" दिनांक १ /४/२०१६ ते १५/४/२०१६ या कालावधीत "Cleanliness Drive in Slum communities (झोपडपट्टी क्षेत्र) " येथे विशेष स्वच्छता अभियान राबविणे बाबतचा तपशील व इतर महत्वाचे मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करणेत आली आहे. सदर ई-मेल दिनांक २/४/२०१६ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या ई-मेल आई-डी वरून आपल्याला फॉरवर्ड करणेत आलेले आहे. त्या अंतर्गत खालील बाबी नमुद करणेत आलेल्या आहेत:

- झोपडपट्टी क्षेत्रांमधील स्वयंसहाय्यता गट (Self Help Group) /बचत गट प्रतिनिधींचे सहकाराने झोपडपट्टी क्षेत्रांमधील नागरिकांसमवेत परिसर स्वच्छतेबाबत बैठक आयोजित करावी व तेथील स्वच्छतेच्या विषयी तक्रार असलेस त्यावर कार्यवाही करणे.
- झोपडपट्टी क्षेत्रांमधील स्वयंसहाय्यता गट (Self Help Group) /बचत गट प्रतिनिधींनी खालील प्रमाणे शपथ घ्यावी की:
  - त्यांचे गटातील/ संस्थेतील कोणतेही प्रतिनिधीं उघड्यावर शौचास जाणार नाहीत.
  - त्यांचे गटातील/ संस्थेतील प्रत्येक प्रतिनिधीचे घरी वैयक्तिक शौचालय असेल व त्याचा नियमीत वापर करतील.
  - त्यांचे गटातील/ संस्थेतील प्रत्येक प्रतिनिधीचे घरी कचरा पेटीचा नियमीत वापर करतील.

या उपरोक्त, झोपडपट्टी क्षेत्रांमधील शाळा व आंगणवाडीमधील शिक्षक /शिक्षीकांना स्त्री- पुरुषांना, लहान मुलांना वापरणेस अनुकूल असे शौचालय बांधणे व विद्यार्थींना उघड्यावर शौच करणेचे आरोग्यास होणारे घातक परिणामांची माहिती द्यावी. तसेच विद्यार्थ्यांकडून खालील बाबींचे हमी पत्र भरून घ्यावे :

- त्यांचे शाळेतील/ संस्थेतील कोणतेही विद्यार्थी तसेच त्यांचे कुटुंबातील कोणीही व्यक्ति उघड्यावर शौचास जाणार नाहीत.
- त्यांचे शाळेतील/ संस्थेतील सर्व विद्यार्थी त्यांचे घरात शौचालय नसलेस त्यांचे घरी वैयक्तिक शौचालय बांधतील व त्याचा नियमीत वापर करतील.
- त्यांचे शाळेतील/ संस्थेतील सर्व विद्यार्थी त्यांचे घरात कचरा व्यवस्थापन करणेकामी कचरा पेटीचा नियमीत वापर करतील.

वरील स्वच्छतेच्या मोहिमे करिता मोहिमे आधी, मोहिमे दरम्यान व मोहिमे नंतर असे, शपथ घेताना व विद्यार्थ्यांकडून भरून घेतलेले हमी पत्र इत्यादिंचे छायाचित्रण करून ते योग्य माहिती-तपशील सह स्वच्छ भारत अभियानाच्या https://swachhbharat.mygov.in या संकेतस्थळावर आपलेमार्फत अपलोड करावे, ट्विटर वर #MyCleanIndia hash tag वापरून अपलोड करावे किंवा फेसबुक वर Swachh Bharat Mission - Urban वर पोस्ट करणे. तसेच सदरची बातमी स्थानिक वृत्तपत्रात व वृत्तवाहिनीत प्रसिद्ध होणेकामी विशेष प्रयत्न करावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) राबविण्यात येत असून सदर अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड शहराचे सर्वेक्षण झालेले असून सदर सर्वेक्षणात देशात ९वा क्रमांक व महाराष्ट्र राज्यात १ला क्रमांक आलेला आहे. सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी **"स्वच्छ भारत अभियान"** अंतर्गत **"Theme Based Cleanliness"** समाधानकारकरित्या हाती घेणेचे दृष्टीने आपण आवश्यक ती दक्षता घ्यावी आपल्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली आपले महानगरपालिकेतील सर्व विभाग व क्षेत्रिय कार्यालयांनी उत्तम कामगिरी करावी.

तसेच, स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक यांचेशी आपआपसांत समन्वय साधून तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून स्वच्छतेचे कामकाज पूर्ण करून घ्यावे. त्यानुसार, "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत **"Cleanliness Drive in Slum communities (झोपडपट्टी क्षेत्र)" येथे विशेष स्वच्छता अभियान"** प्रभावीपणे राबविणेत यावे व शासनाने मागविलेले अहवाल वेळेत पाठविणेची दक्षता घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रति,
१) सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक
२) क्षेत्रीय अधिकारी, अ/ब/क/ड/ई/फ क्षेत्रीय कार्यालय

महापालिकेतील सर्व विभागात वरील "Theme Based Cleanliness" हाती घेणेत यावे तसेच स्वच्छता कार्यक्रमाची योग्य नोंद ठेवणेत यावी. त्या बाबतचा अहवाल संबंधित क्षेत्रीय कार्यालय, सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक व माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे hard copy व soft copy (Microsoft Word File) स्वरुपात पाठविणेची दक्षता घ्यावी व त्याचे संपूर्ण रेकॉर्ड आपले विभागात तपासणी करिता उपलब्ध ठेवावा.

३) आरोग्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग

क्षेत्रिय कार्यालयांकडून वरील "Theme Based Cleanliness" बाबतचे अहवाल, छायाचित्रे इत्यादि soft copy (Microsoft Word File, image file) स्वरुपात उपलब्ध करुन माहिती व तंत्रज्ञान विभागास दि. १६/४/२०१६ रोजी सादर करावी.

४) सहा. आयुक्त, नागरवस्ती विभाग

महापालिकेतील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (Self Help Group) /बचत गटांची यादी क्षेत्रिय कार्यालयानुसार संपर्क, पत्ता, पदाधिकारी यांचे संपर्क क्रमांकासह संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांना देणेत यावी.

५) सहा. आयुक्त, माहिती व जन संपर्क विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

**PRAVEEN PRAKASH**, IAS
Joint Secretary & Mission Director (SBM)
GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF URBAN DEVELOPMENT

**प्रवीण प्रकाश**, आई.ए.एस.
संयुक्त सचिव एवं मिशन निदेशक (एस.बी.एम.)
भारत सरकार
शहरी विकास मंत्रालय

DO. No. SB / SBM / 34 / 2016

Date: 1st April 2016

Dear Sir / Madam,

**Re: Thematic Cleanliness drive: 1st – 15th April 2016**

Kindly refer to circular number SB / SBM / 30 / 2016 dated 29th March 2016, giving the detailed calendar of thematic drives to be taken up during April 2016 – March 2017.

The theme for the special drive to be conducted during the fortnight 1st – 15th April 2016 will be "**Cleanliness drives in slum communities**". During this fortnight, please arrange to conduct meetings with all the self-help groups (SHGs) in slum communities in your city to get them to carry out the following activities:

- All SHGs in slums to take oaths that:
  - ➢ None of their members will go out for open defecation
  - ➢ each member of the SHG will ensure that their households construct / use a toilet
  - ➢ every member of the SHG will have a dustbin in their house to dispose of their waste effectively
- The proceedings of the SHG meetings may be recorded, collected, and uploaded on the swachhbharat.myogv.in portal, and well as published as press clippings.

Additionally, please arrange to sensitise teachers of all slum schools / anganwadis about the importance of having functional, gender friendly / child friendly toilets in their schools, and the evils of open defecation. Undertakings may be collected from the school children on the following:

- No student will go out / allow any family member to go out for open defecation
- Each student will encourage his/her family to construct / use a toilet
- Each student will encourage his/her family to have dustbins in the house to dispose of the household waste

These undertakings from students of the slum schools may also be similarly collected and uploaded on the swachhbharat.myogv.in portal, and well as published as press clippings.

We look forward to your cooperation in making this drive a success.

With regards,

Yours sincerely,

**(Praveen Prakash)**

All State Mission Directors (SBM) All Municipal Commissioners
c.c. DS-SBM (MSS) / JA-CPHEEO

Office : 140-C, Nirman Bhawan, New Delhi-110011 • Mob : 9013133636, Phone : 011-23062309, Fax : 23062477
praveenprakashud@gmail.com; praveen.prakash71@nic.in